# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,
# परभणी

जा.क्रं.अेपीपी-१८/२०१९
दिनांक ०८.०२.२०१९

## निवेदन

**विषयः- कृषि सहाय्यक (पदवीधर) पदांच्या लेखी परिक्षे बाबत.**

विद्यापीठ जाहीरात क्रं.वनामकृवि-१/२०१४ दिनांक २५.११.२०१४ च्या अनुषंगाने दिनांक ०३.०२.२०१९ रोजी वनामकृवि, परभणी येथे आयोजीत कृषि सहाय्यक (पदवीधर) पदासाठीच्या लेखी परिक्षेची प्रश्नपत्रिका व त्यांची उत्तरे ठळक अक्षरामध्ये दर्शवून त्याच दिवशी उत्तरसूची विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती व उत्तराबाबत काही आक्षेप असल्यास दि.६.२.२०१९ सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत परिक्षार्थीकडून आक्षेप मागविण्यात आले होते.

तद्नुषंगाने विद्यापीठाकडे प्राप्त झालेल्या आक्षेपांबाबत योग्य निर्णय घेणेसाठी दिनांक ८.२.२०१९ रोजी संबंधीत विषय तज्ञांची बैठक घेण्यात आली. प्राप्त आक्षेपावर तज्ञ अधिका-यांकडून प्राप्त झालेल्या अभिप्रायानुसार मा.अध्यक्ष तथा संचालक, विस्तार शिक्षण, वनामकृवि, परभणी यांनी उत्तरसुचित दुरुस्त्या केलेली सुधारीत उत्तरसूची यासोबत **www.vnmkv.ac.in** या विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

**कुलसचिव** करिता